SSA

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/१२०८/२०२४
दिनांक : १२/०६/२०२४

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

स.नं.४८पै, सम्राटनगर व स.नं.५१पै, संग्रामनगर, सि.स.नं.१०१५पै, सेक्टर क्र.२२, निगडी, पिंपरी चिंचवड, (अंकुश चौक, आझादनगर) पुणे अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.११/०३/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.१२/०३/२०२४ रोजी डकविण्यात आली असून दि.१२/०३/२०२४ रोजीच्या दै. दायित्व व दै. प्रभात या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, मंगळवार, मार्च १२, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.६ व ७ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/०४/कावि/२०२/२०२२, दि.२९/१०/२०२२ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्र.३ झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.११/०१/२०२४ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ७/१२ उता-यानुसार एकूण २९२६०.०० चौ.मी. असून, त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार १०७८६.०९ चौ.मी. इतके आहे. त्यामुळे सदर योजनेकरीता वरीलपैकी कमीत कमी १०७८६.०९ चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे. तसेच स्थलांतरणाने पुनर्वसन प्रस्तावित असलेल्या अनुसूची २ मध्ये नमूद केलेल्या MIDC प्लॉट नं.GP -३१, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे येथे स्थलांतरण प्रस्तावित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या आदेश क्र. MIDC/RO(PUNE)/Pimpri/७५३, दि.२३/०२/२०२४ च्या भूखंड वाटप आदेशानुसार सदर भूखंडाचे १८१५३.०० चौ.मी. इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे सदर बाबत कोणतीही हरकत अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

(६) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

(७) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे मुंबई ,येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची क्र.१
सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.४८पै, सम्राटनगर व स.नं.५१पै, संग्रामनगर, सि.स.नं.१०१५पै, सेक्टर क्र.२२, निगडी, पिंपरी चिंचवड, (अंकुश चौक, आझादनगर) जिल्हा-पुणे (Non Buildable)
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (अंदाजे) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| सम्राट नगर | स.नं. ४८पै, सि.स.नं. १०१५ पै | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | १०७८६.०९ चौ.मी. | लागू रस्ता व स.नं.५९ पै | लागू रस्ता व स.नं.४८ पै | स.नं.४८ पै व स.नं.४७ | लागू रस्ता स.नं.४८ पै |
| संग्राम नगर | स.नं.५१पै, सि.स.नं. १०१५ पै. | | | लागू स.नं.५४ व स.नं.५२ | स.नं.५१ पै, सि.स.नं. १०१५पै | स.नं.५१ पै, सि.स.नं. १०१५पै | स.नं.५१ पै, सि.स.नं. १०१५पै |

४५७

अनुसूची क्र.२

ज्या ठिकाणी पुनर्वसन करावयाचे ते क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- MIDC प्लॉट नं.GP -३१, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, जिल्हा- पुणे.
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे | MIDC प्लॉट नं.GP -३१ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी.) | १८१५३.०० चौ.मी. | शाळा जी.पी १३१, O/S II play ground | १८.५ मी रस्ता | २४.०० मी रस्ता | MIDC ESR, Plot No. GP १९७ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १२ / ०६ /२०२४.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

10.6.24

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
४. विकसक मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी- यांना पुढील कार्यवाहीस्तव.